# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २८/०६/२०२१ (सोमवार )

## —: चोरी (जनावर) :—

पो.स्टे.रामटेक :— :— अंतर्गत ७८ किमी अंतरावरील मौजा भिलेवाडा शिवारात कमलाकर चिधुजी गेडेकर रा. भिलेवाडा यांचे शेत असून दिनांक २७/१२/२०२१ चे १३/३० ते १४/०० वा. दर यांचे शेतात शेतातील **३ बकऱ्या व २ बकरे** गाडी शिप्ट क्र. एमएच ४९ एफ १२३७ मध्ये अज्ञात इसमा चोरून घेवुन जाताना आढळुन आले, यांनी लगेज गावकऱ्यांचा मदतीचे पाठलाग केला असता अनोळखी वाहन चालक आरोपी आपली गाडी सोडुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी कमलाकर चिधुजी गेडेकर वय ३७ वर्ष रा. भिलेवाडा चे तोंडी रिपोर्ट वरुन गाडी शिप्ट क्र. एमएच ४९ एफ १२३७ चे चालकाविरुध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३७९ भा.दं. वि.अन्वये गुन्हा नोंद केला असून आरोपीचा शोध घेणे सूरु आहे. पुढील तपास नापोशि गजानन उकेबोन्द्रे मो. न. ९८८१२ ४१०८९ हे करीत आहे.

## —: चोरी (मोबाईल) :—

पो.स्टे.मौदा :— अंतर्गत ८ किमी अंतरावरील मौजा महालगांव येथील रहवासी निनाद लक्ष्मणजी कडु हा दिनांक २७/०६/२०२१ चे रात्री आपल्या घरी मोबाईल पाहता पाहता रात्री मोबाईल हॉल खुल्या खिडीमध्ये ठेवुन हॉलमध्ये झोपला होता सकाळी ०७/०० वा. दर आपला मोबाईल पाहिला असता मोबाईल दिसला नाही घरचे तसेव आजुबाजुला घराच्या लोंकाना विचारपुस केली पण मोबाईल मिळुन आला नाही कोणीतरी अज्ञात इसमानी मोबाईल वन प्लस—८ कि. ४९,९९९/ रु चोरुन नेला

सदर प्रकरणी फिर्यादी निनाद लक्ष्मणजी कडु वय २५ रा. महालागाव चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३७९ भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंद केला असून आरोपीचा शोध घेणे सूरु आहे. पुढील तपास पोहवा प्रशांत काळे मो.क्र ७०८३१ ५१९९३ हे करीत आहे.

## —: चोरी (मोटार सायकल) :—

पो.स्टे.काटोल :— काटोल शहर येथील तार बाजार येथे श्याम मुरलीधर मोटवाणी, रा. लक्ष्मी नगर काटोल यांची कापड विक्रीचे दुकन आहे दिनांक २६/०६/२०२१ चे सकाळी ०९.३० वा. दरम्यान यांनी आपली **स्पेलण्डर गाडी क्र. एमएच—४० डी आर ४३४९** गाडी राठी च्या दवाखण्यासमोर उभी करून ठेवली व आपल्या दुकान उघडून बसले, सायकाळी परत जात असता त्यांना ठेवलेल्या ठिकानी त्यांची मोटार सायकल उभी दिसली नाही मोटारसायकलच्या डिक्कीमध्ये गाडीचे सर्व कागदपत्रे होते त्यांनी मोटार सायकलीचा शोध घेतला मिळून आली नाही कोणीतरी अज्ञात इसमानी मोटारसायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी श्याम मुरलीधर मोटवाणी, वय ३७ वर्ष रा. लक्ष्मी नगर काटोल चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ३७९ भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंद केला असून आरोपीचा शोध घेणे सूरु आहे. पुढील तपास नापोशी संतोष आधळे मो. न. ८३८०८३३४२४ हे करीत आहे.

**—: अकस्मात मृत्यु :—**

पो.स्टे.काटोल :— अंतर्गत १२ किमी अंतरावरील मौजा पारडसिंगा येथे दिनांक २७/०६/२०२१ रोजी १६.०० वा. ते १६.३० वा. दरम्यान सौ. कमलाबाई चंपतराव भकते वय वय ६५ वर्ष ,रा पारडसिंगा हया आपल्या भिंतीला थैली लटकवित असता तिच्**या उजव्या हाताचे अंगठयाला कोणतेतरी सरपटणारे विषारी प्राणी चावल्**याने ती मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी धनराज चंपतराव भकते वय ४५ वर्ष रा पारडसिंगा चे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन काटोल येथे अकस्मात मृत्यु क्रमांक ४५/२१ कलम १७४ जाफौ नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ जवाहर चव्हाण मो.क्र. ९५४५३ ६३१२१ हे करित आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**